असा. क्र. १७ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, एप्रिल १२, २००३/चैत्र २२, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

---

### अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००३ चा अधिनियम क्रमांक १५.— महाराष्ट्र वैद्यकीय व दंत वैद्यकीय महाविद्यालय प्रवेश (विनियमन व अखिल भारतीय कोटा रद्द करणे) अधिनियम, २००३. . . १३३-१३७

दिनांक ११ एप्रिल २००३ रोजी राज्यपालानी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याव्दारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,

विधी व न्याय विभाग.

---

### सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १२ एप्रिल २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**पदवीपूर्व व पदव्युत्तर वैद्यकीय व दंतवैद्यकीय शिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यात असलेल्या शासकीय व महापालिका वैद्यकीय व दंतवैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रियेचे आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींचे विनियमन करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन, शासकीय व महापालिका वैद्यकीय व दंतवैद्यकीय महाविद्यालयांच्या एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. च्या अभ्यासक्रमासाठीच्या एकूण प्रवेश क्षमतेपैकी १५ टक्के जागा (दरसाल सुमारे ३१५ जागा) व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या एकूण प्रवेश क्षमतेपैकी २५ टक्के जागा (दरसाल सुमारे २५६ जागा) " अखिल भारतीय स्तरावरील नियत कोट्या " साठी उपलब्ध करून देत आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** भारत सरकारकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखांमधून मिळविलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, गेल्या अनेक वर्षांत, वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय स्तरावरील नियत कोट्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या ३१५ जागांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील सरासरी तीन उमेदवारांना दरवर्षी या जागांसाठी निवडले जाते ;

**आणि ज्याअर्थी,** या आकडेवारीवरून असेही दिसून आले आहे की, जी अशांत क्षेत्रे नाहीत किंवा जेथे वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधादेखील कमी नाहीत अशा, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणा व पंजाब यांसारख्या राज्यांमधून फार मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी या " अखिल भारतीय स्तराबरील नियत कोट्या " साठी राखून ठेवलेल्या जागांकरिता निवडले जातात ;

**आणि ज्याअर्थी,** वास्तविक, जेथे वैद्यकीय शिक्षणाच्या पुरेशा सुविधा नाहीत अशा अरुणाचल प्रदेश, दमण व दीव, दादरा व नगरहवेली, लक्षद्वीप, मिझोराम, नागालॅन्ड इत्यादींसारख्या राज्यांच्या तुलनेत, या राज्यांमध्ये वैद्यकीय शिक्षणाच्या अधिक चांगल्या सुविधा असताना, उपरोक्त, आकडेवारीवरून असेही दिसून आले आहे की, विद्यमान पद्धतीनुसार, या गरजू राज्यांना मिळणारे लाभ हे अत्यंत नगण्य आहेत व त्यामुळे, " अखिल भारतीय नियत कोटा पद्धती " मागील मुख्य उद्दिष्टच विफल ठरते ; आणि त्याच्या परिणामी, महाराष्ट्र राज्याचे कायम निवासी विद्यार्थी व करदाते, आपल्या स्वत:च्याच राज्यातील साधनसंपत्तीचा लाभ मिळण्यापासून वंचित रहातात ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन, आपल्या स्वत:च्या साधनसंपत्तीमधील प्रतिवर्षी रु. २.५ लाख एवढी मोठी रक्कम वैद्यकशास्त्राच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिक्षणावर खर्च करीत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने " अखिल भारतीय नियत कोट्या " तील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च केलेली रक्कम ही, एम.बी.बी.एस., बी.डी.एस. च्या पहिल्या वर्षाकरिता जवळजवळ रु. ७.८८ कोटी एवढी तर पाच वर्षे कालावधीच्या संपूर्ण अभ्यासक्रमाकरिता रु. ३९.४ कोटी एवढी आहे ; आणि यातील बहुसंख्य विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण केल्यावर, आपल्या मूळ राज्यात परत जातात. परिणामी, राज्य शासनाने आपल्या निवासी करदात्यांच्या खर्चाने प्रशिक्षण दिलेल्या डॉक्टरांच्या सेवांचे हक्काचे लाभ महाराष्ट्र शासन, मिळवू शकत नाही ;

**आणि ज्याअर्थी,** टी. एम. ए. पै. फाऊंडेशन विरुद्ध कर्नाटक राज्य यांच्यामधील अलीकडच्या न्यायनिर्णयात, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या सांविधानिक न्यायपीठांच्या अकरा न्यायाधीशांच्या निकालामुळे उन्नीकृष्णनच्या प्रकरणातील निर्णयास अनुसरून, तयार करण्यात आलेली योजना रद्द करून, माननीय सर्वोच्च न्यायालयाने इतर गोष्टींबरोबरच, असे निदेश घालून दिले आहेत की, खाजगी महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाने द्यावयाच्या प्रवेशांसाठी जागांची विवक्षित टक्केवारी राखून ठेवली जाईल तर उर्वरित जागा, राज्य अभिकरणांकडून

समुपदेशनाच्या आधारावर भरल्या जातील आणि त्या संबंधातील टक्केवारी, स्थानिक गरजेनुसार, राज्याकडून निश्चित केली जाईल ; आणि परिणामी, राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पूर्वी उपलब्ध करून दिलेल्या जागांइतक्याच असतील अशा मोठ्या संख्येतील " अखिल भारतीय नियत कोट्या " मधील जागा, " अखिल भारतीय स्तरा " वरील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्याकडून अजूनही उपलब्ध होतील ;

**आणि ज्याअर्थी,** वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थीवर्ग, राज्याचे कायम निवासी व करदाते यांच्या हिताच्या दृष्टीने आणि राज्याच्या व्यापक हिताच्या दृष्टीने तसेच, सध्याची " अखिल भारतीय नियत कोट्या " ची पद्धती, ती ज्या उद्दिष्टासाठी सुरू करण्यात आली होती ते उद्दिष्ट एकूणच साध्य करू शकलेली नाही, तसेच या योजनेमुळे सामंजस्य व देवाणघेवाण होण्याऐवजी उलट भेदभावच निर्माण होत आहे व परिणामी फार मोठा असमतोल निर्माण होत असून तो राज्याच्या हितसंबंधाला बाधक ठरत आहे, ही वस्तुस्थितीही लक्षात घेता, महाराष्ट्र शासनास, " अखिल भारतीय योजने " तून (नियत कोट्यातून) एम.बी.बी.एस. आणि बी.डी.एस. पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या जागा काढून त्या, राज्यातील स्थानिक विद्यार्थ्यांना, तसेच वैद्यकीय व दंतवैद्यकीय शिक्षणाच्या सुविधांचा अभाव असलेल्या व अशांत असलेल्या क्षेत्रांतील किंवा राज्यांतील विद्यार्थ्यांना देणे, इष्ट वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे या बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वैद्यकीय व दंतवैद्यकीय महाविद्यालय प्रवेश (विनियमन व अखिल भारतीय नियत कोटा रद्द करणे) अधिनियम, २००३ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकाला अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(१) " अखिल भारतीय स्तरावरील जागा " किंवा " अखिल भारतीय नियत कोटा " याचा अर्थ, भारत सरकारने वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी निर्धारित केलेल्या योजनेनुसार शासनाने, महाराष्ट्र राज्यातील शासकीय व महापालिका वैद्यकीय व दंतवैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असणाऱ्या जागांच्या एकूण संख्येपैकी एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. पदवी अभ्यासक्रमाच्या १५ टक्के जागा व वैद्यकीय व दंतवैद्यकीय अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या २५ टक्के जागा, याप्रमाणे विद्यार्थांना अखिल भारतीय स्तरावर उपलब्ध करून दिलेल्या जागा असा आहे ;

(२) " नियत दिनांक " याचा अर्थ, कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये नियत केलेला दिनांक, असा आहे ;

(३) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा राज्य शासनाकडून पदनिर्देशित करण्यात आलेला अन्य अधिकारी, असा आहे ;

(४) " संचालक " याचा अर्थ, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, असा आहे ;

(५) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(६) " वैद्यकीय प्रवेश " याचा अर्थ, एम.बी.बी.एस. पदवी अभ्यासक्रम आणि बी.डी.एस. पदवी अभ्यासक्रम यांसाठी प्रवेश, असा आहे, आणि त्यात वैद्यकीय व दंतवैद्यकीय ज्ञानशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेशाचा अंतर्भाव होतो ;

(७) " वैद्यकीय महाविद्यालये " याचा अर्थ, राज्य शासनाकडून चालविण्यात येणारी वैद्यकीय व दंतवैद्यकीय महाविद्यालये, असा आहे आणि त्यामध्ये, राज्यात स्थानिक प्राधिकरणांकडून चालविण्यात येणाऱ्या वैद्यकीय व दंतवैद्यकीय महाविद्यालयांचा अंतर्भाव होतो ;

(८) " वैद्यकीय जागा " याचा अर्थ, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या जागा, असा आहे ;

(९) " स्थानिक विद्यार्थी " याचा अर्थ, सामान्यपणे सलग १५ वर्षांहून कमी नसेल एवढ्या कालावधीकरिता महाराष्ट्र राज्याच्या प्रादेशिक अधिकारितेमध्ये रहात असणारे विद्यार्थी, असा आहे ;

(१०) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

अखिल भारतीय नियत कोटा रद्द करणे.

**३.** कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, आदेशात किंवा निदेशात किंवा कोणताही कायदा, नियम, विनियम, उपविधि, योजना, दस्तऐवज किंवा संलेख यात एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिनांकाला व त्या दिनांकापासून, राज्यातील वैद्यकीय प्रवेशासंबंधातील " अखिल भारतीय नियत कोटा " रद्द होईल :

परंतु, राज्यातील वैद्यकीय जागांच्या एकूण संख्येपैकी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित जागा, भारत सरकारकडून अशांत क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रातील तसेच जेथे वैद्यकीय किंवा दंतवैद्यकीय शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत अशा राज्यांमधील पात्र विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येतील :—

४० जागा एम.बी.बी.एस. पदवी अभ्यासक्रमासाठी ;

५ जागा बी.डी.एस. पदवी अभ्यासक्रमासाठी ;

१८ जागा वैद्यकीय ज्ञानशाखेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी ; आणि

२ जागा दंतवैद्यकीय ज्ञानशाखेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी :

परंतु, आणखी असे की, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, राखीव जागांसंबंधातील विद्यमान धोरण व शासनाकडून वैद्यकीय प्रवेशासंबंधात वेळोवेळी घोषित करण्यात आलेले राखीव जागांसंबंधातील धोरण यांना बाध येणार नाही.

४. शंकानिरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की— नियत कोटा रद्द केल्याचा परिणाम.

(क) नियत दिनांकापासून, राज्यामध्ये अखिल भारतीय स्तरावर राखून ठेवण्यात आलेला, वैद्यकीय जागांचा कोणताही "अखिल भारतीय नियत कोटा" असणार नाही आणि अखिल भारतीय कोट्यांमधून अखिल भारतीय स्तरावर वैद्यकीय प्रवेशाची तरतूद करणाऱ्या, भारत सरकारने आखून दिलेल्या योजनेमधून राज्य शासन, याद्वारे, माघार घेत आहे ;

(ख) कलम ३ मध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, भारत सरकारच्या योजनेखालील "अखिल भारतीय नियत कोटा" रद्द करण्यात आल्यावर, त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या वैद्यकीय जागा, राज्यातील इतर वैद्यकीय जागांबरोबर सक्षम प्राधिकाऱ्याने, वैद्यकीय प्रवेशासंबंधात वेळोवेळी घालून दिलेली कार्यपद्धती अनुसरूनच भरण्यात येतील व सक्षम प्राधिकाऱ्याने, वैद्यकीय प्रवेशासंबंधात वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्तींनाच अधीन असतील.

५. (१) या अधिनियमांच्या तरतुदी अंमलात आणतांना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनाला, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील, व शंका किंवा अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा तरतुदी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे करता येतील किंवा असे निदेश देता येतील : शंका किंवा अडचण दूर करणे.

परंतु, नियत दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमाखाली काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई